संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# कौतुक सोहळा आणि युद्धस्थितीच्या झळा

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्वाचित पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ पूर्ण करण्याचा कौतुक सोहळा होत असताना आणि देशाच्या विकासाची ग्वाही दिली जात असताना दुसरीकडे घडलेल्या काही घटना या निश्चितच विचार करायला लावणाऱ्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे या कौतुक सोहळ्यामध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही सहभागी झाले. त्यांनी मोदींना एक मोठी कारकीर्द पार पाडल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. मात्र त्याच दिवशी रात्री अमेरिका, इराणच्या या स्वार्थी संघर्षाच्या हल्ल्याने पुन्हा विचित्र वळण घेतले. होर्मुज बंदरातल्या भारतीय जहाजांवरही हल्ला झाला आणि त्यात जहाजावरचे भारतीय कर्मचारी मृत्यूमुखी पडले आणि पस्तीस जणांची सुटका करण्यात आली. याच पद्धतीने आणखी एक भारतीय जहाज हल्ल्याच्या भक्ष्यस्थानी पडले. दुसरीकडे भारताच्या सुरक्षिततेचे आश्वासन दिले जात असताना जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराच्याच एका अचानक झालेल्या स्फोटात महाराष्ट्रातले दोन वीर जवान हुतात्मा झाले. आणि तिसरी गोष्ट म्हणजे या कौतुक सोहळ्याच्यानिमित्ताने देशाच्या डिजिटल इंडियाची भरारी सांगितली जात असताना गुगल कंपनीच्या एका डेटा सेंटरमध्ये आग लागल्याचा प्रकार घडला. आणि भारतातल्या सगळ्या प्रमुख शहरांमधली गुगल सेवाही विस्कळीत झाली. मोदींच्या बारा वर्षांच्या कालावधीचा दिवस आणि या घडून आलेल्या घटना यांचा परस्परांशी थेट संबंध जरी नसला तरी एकूणच देशाच्या विकासाची मांडणी करीत असताना अजूनही खूप मोठा टप्पा गाठायचा बाकी आहे. आणि त्याचबरोबर अत्यंत महत्त्वाच्या त्रुटी किंवा उणीवा अनेक व्यवस्थांमध्ये तितक्याच प्रभावीपणे असल्याचे सिद्ध होते. भारत हा जगातल्या अन्य देशांपेक्षा खूप वेगळा देश ठरतो. सर्वाधिक लोकसंख्या, सर्वाधिक विविधता, अशा महत्त्वाच्या कारणांमुळे देशाच्या विकासामध्ये सातत्याने अडथळे निर्माण होत असतात. म्हणूनच विकासाचे कौतुक करत असताना या सगळ्या प्रयत्नांमधल्या उणीवा किंवा त्रुटी तितक्याच गांभीर्याने लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.

### इराणबरोबरचा वाढता संघर्ष

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प शुभेच्छा देत आहेत. परंतु इराणबरोबरच्या संघर्षात भारताला सावध राहण्याची सूचना ते करू शकलेले नाहीत. अन्यथा अमेरिका भारत मैत्रीचा एक स्वाभाविक परिणाम म्हणून होर्मूज बंदरातून कोणत्याही भारतीय जहाजांना धोका उत्पन्न होता कामा नये. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे संबंध जरी भारताने सुधारले असले तरी अशा या युद्धाच्या प्रसंगात भारतीय जहाजं असतील किंवा युद्धग्रस्त भूमी असलेल्या भारतीयांचं संरक्षण असेल. या सर्वांबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. अगदी भारतातसुद्धा जम्मू- काश्मीरमध्ये सातत्याने दहशतवादाविरुद्ध संघर्ष सुरू आहे. आता ऊरी येथे ॲक्सिडेंटल ब्लास्ट घडून आला. आणि त्यात महाराष्ट्राच्या दोन सुपुत्रांना वीरमरण आले. जम्मू-काश्मीर परिसरामध्ये एरवीसुद्धा कोणत्याही प्रकारचे स्फोट आणि घातपात, दहशतवादी हल्ले घडून येण्याची शक्यता असते. यासाठी अत्यंत सावध राहण्याची आवश्यकता असते. तशी सावधानता बाळगूनही जर असा ॲक्सिडेंटल स्फोट घडत असेल आणि त्यात दोन वीर जवान गमावण्याची वेळ येत असेल तर ही बाबसुद्धा सावधगिरीच्या उपाययोजनांमध्ये उणीवा असल्याचेच सिद्ध करणारे ठरते. शत्रूच्या हल्ल्यामध्ये किंवा शत्रूशी संघर्ष करताना येणारे वीरमरण, ही जवानांनी स्वीकारलेली सर्वात मोठी जोखीम असते. परंतु लष्कराच्याच व्यवस्थापनामध्ये काहीतरी गडबड गोंधळ होणे आणि अशा त्रुटींमुळे जवानांचे प्राण जाणे हे अत्यंत धक्कादायक ठरते. एकेक जवान तयार करण्यासाठी प्रचंड परिश्रम करावे लागत असतात. प्रचंड मेहनतीने आणि तितक्याच जिद्दीने, निष्ठेने तयार होणाऱ्या जवानांचे संरक्षणसुद्धा महत्त्वपूर्ण मानले पाहिजे. जवान किंवा लष्करातली नोकरी म्हणजे जीव गमावण्याची निश्चिती असे समीकरण करून चालणार नाही. अधिकाधिक जवानांचे जीव वाचवून केला जाणारा संघर्ष हा अधिक विजयी स्वरूपाचा ठरतो. अर्जुन राजेंद्र जाधव  हे सातारा जिल्ह्यातल्या शहापूरचे रहिवासी आहेत. तर विक्रम चव्हाण हे नवी मुंबई ऐरोलीचे आहेत. जाधव यांच्या अकरा महिन्यांच्या मुलाच्या पहिल्याच वाढदिवसाच्या एक दिवस आधीच त्यांना वीरमरण यावे. यातून त्या कुटुंबावर कोसळलेला आघात लक्षात घेता येतो.

### परस्परविरोधी परिस्थिती

महाराष्ट्र सरकारने केवळ शोकसंवेदना व्यक्त करून थांबू नये. तर महाराष्ट्रातल्या वीरगती प्राप्त सुपुत्रांची काळजी घेण्याचा विशेष प्रयत्न केला पाहिजे. लष्कराच्या व्यवस्थांमधल्या या उणिवांमधूनच हा अपघात घडलेला आहे. अशा पद्धतीने आपल्याच जवानांचे आपल्याच गैरव्यवस्थापनातून बळी जाणे अत्यंत दुर्दैवी ठरते. म्हणूनच देशाच्या विकासाचे गोडवे गात असताना अजूनही बऱ्याच गोष्टी दुरूस्त करणे बाकी आहे. आज आपण डिजिटल इंडियाचीदेखील दवंडी पिटत असतो. गेल्या पाच वर्षांत भारताने निश्चितच डिजिटल व्यवहारांमध्ये खूप प्रगती केलेली आहे. परंतु डेटा सेंटरमध्ये आगीसारखी घटना घडते आणि गुगलसेवा विस्कळीत होणे याचा अर्थ अशा दुर्घटनांची संभाव्यता लक्षात घेऊन पर्यायी व्यवस्था तयार करणे तितकेच गरजेचे ठरते. आणि तशी पर्यायी व्यवस्था आजच्या या डिजिटल इंडियामध्ये नाही किंवा त्याचा भारताला अशा पद्धतीने फटका बसू शकतो, हे या ताज्या घटनेतून स्पष्ट होते. आज तर युद्ध अमेरिका, इराणमध्ये सुरू आहे, पण भारतात या युद्धजन्य परिस्थितीच्या झळा आणि अवकळा दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. पुन्हा नव्याने सुरू झालेला हा संघर्ष भारताची आणखीनच कसोटी पाहणारा ठरू शकतो. खरे तर भारताचा जो काही विकास होतो आहे, तोही एक संघर्षच म्हणावा लागेल. म्हणूनच कौतुक सोहळा साजरा करत असताना सर्वच युद्धस्थितीच्या झळा लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते. राजकीय अर्थाने हे कौतुक जरी योग्य असले तरी सामाजिक दृष्टीने त्याचे परिणाम लक्षात घ्यावेच लागतील.